म. ग्रं. सं. ठाणे
विषय ऐ०वा०
वा. क्र. १६८७४



IRBK-0116874

# मैं मेरी झांसी नहीं दूंगी व शिवाजीमहाराजांच्या भेटीस एक इंग्रज

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र. 28८८७ नों. दि. 31-2-1966
वि. ...... क्र. ......

# मैं मेरी झाँसी नहीं दूँगी

( एक नाटिका )

आणि

# शिवाजी महाराजांच्या भेटीस एक इंग्रज

( एक प्रवेश )

IRBK-0116874
IRBK-0116874

लेखक
श्याम फडके

प्रकाशक :
मो. द. नांदुरकर
अनमोल प्रकाशन,
६८३ बुधवार पेठ, पुणे ४११००२

© श्याम फडके

सूचना : मैं मेरी झाँसी नहीं दूंगी या नाटिकेचे मानधन रुपये ५ व 'शिवाजी-महाराजांच्या भेटीस एक इंग्रज' या प्रवेशाचे मानधन रुपये ३ प्रयोग करण्यापूर्वी सौ. सुमती श्याम फडके, इंदिरा निवास, नौपाडा, ठाणे २, या पत्त्यावर पाठवून परवानगी घेणे आवश्यक आहे.

प्रमुख विक्रेते : रसिक साहित्य, अप्पाबळवंत चौक पुणे ३०

नोव्हेंबर १९७६

किंमत : एक रुपया फक्त

मुद्रक :
म. बा. जोशी,
ज्ञानविलास प्रेस,
२७ बुधवार पेठ,
पुणे ४११००२.

१६८५४
वा० वा
म३१७७
वाचनालय

मुलांनो

या पुस्तकांत एक नाटिका आणि एक प्रवेश दिला आहे. हे दोन प्रकार एकाच पुस्तकात घालण्याचे कारण त्यातील इंग्रजाचे पात्र दोन्हीकडे आहे. मात्र नाटिकेत तो इंग्रज जेता आहे तर प्रवेशात तो विनम्र आहे. त्याचा शब्दोच्चार दोन्हीकडे सारखा आहे, अत्यंत सावकाश, एकेक शब्द उच्चारावा. शेवटचं क्रियापदसुद्धा दाबून म्हणावं. तुम्ही आकाशवाणीवरच्या बातम्या ऐकता ना. तो बातम्या सांगणारा पुरुष किंवा बाई शेवटचा शब्द कसा दाबून बोलतो पहा. तितका स्पष्ट उच्चार व्हावा. आता नाटिकेत पहा

" हा तुमचा पॅलेस तुमच्याकरता ठेवून द्या असं मालकम साहेबांनी तुम्हाला सांगायला सांगितलं आहे " हे वाक्य इंग्रज कसा बोलतो.

" हा टुमचा पॅलेस, टुमचेकरटा ठेऊन द्या, अशं, मालकम शाएबानी टुमाला शांगाला, शांगिटला आहे. '

इंग्रजांचा शब्दोच्चार आपल्या मराठीसारखा स्पष्ट नाही. थोडसं बोबडे बोलल्यासारखं ते तोंडातल्या तोंडात बोलतात.

आता प्रवेशातला इंग्रज पहा....

शिवाजी महाराजांचा विजय असो हे साधे सरळ वाक्य तोडून म्हणावं. उदा—

शिवाजी माराजांच्या विजय अशो

आता या पात्राचे कपडे कसे असतात. ड्रेसवाल्याकडे फिरंग्यांचा ड्रेग मिळतो. त्याचं वैशिष्ठ्य म्हणजे लांब पँट, तिच्या शिवणीवर एक लांबलचक पट्टी असते. सरळ तलवार, वळलेले कल्ले आणि होडी पद्धतीची टोपी. पायात बूट हवेतच रंग लालबुंद....बघा हा प्रवेश करून.

---

## मैं मेरी झाँशी नहीं दूँगी

( स्थळ – झाशीच्या राणीचा महाल )

पात्रे – १. राणी लक्ष्मीबाई

२. मोरोपंत तांबे

३. मेजर जनरल एलीस

४. लक्ष्मणराव पांडे

( महालात राणी सचिंतपणे फेऱ्या घालीत आहे. बाहेरून तिचे वडील मोरोपंत तांबे येतात ).

मोरोपंत : छबेली . . .

राणी : कोण ? बाबा तुम्ही !

मोरोपंत : किती विचार करशील बेटा ! एकदा गेलेली वेळ पुन्हा मिळवता येईल का ? नाही ना !

राणी : मला समजतंय बाबा .... पण ....

मोरोपंत : पण काय ! झालेला प्रकार तुझ्याइतकाच प्रत्येक झाशीकराच्या हृदयाला चाटून गेलाय. त्यांची आशा आता तूच नाहीस का ?

राणी : काय करू मी ?

मोरोपंत : धीर धर छबेली... झाशीकरांची नजर आता तुझ्याकडे आहे. आणि तूच जर अशी एकाच ठिकाणी नजर लावून बसलीस तर त्यांचं कसं होणार ?

राणी : नाही बाबा – माझ्या मनाची आता नक्कीच खात्री झाली आहे की दैव माणसाची चेष्टा करीत असावं.

मोरोपंत : मी नाही समजलो छबेली. काय म्हणायचंय तुला ?

राणी : बाबा किती दिवसांपासून विचार करतेय मी – अगदी रघुनाथरावांच्या कारकीर्दीचा विचार केला तरी अगदी सहज दिसून येत आहे की आमच्या घराण्यातल्या प्रत्येक माणसाला दैव खेळवीत असावं.

मोरोपंत : मला नाही तसं वाटत.

राणी : म्हणजे ?

मोरोपंत : दैवाच्या फाशावर नशीब ठरवण्याइतकं काही तुमचं घराणं कमकुवत नव्हतं. किंवा वाऱ्यावर उडालं आणि नशिबी उतरलं असाही तुमच्या घराण्याचा लौकिक नाही. सुभेदार नेवाळकर घराण्याचे कर्तृत्व थोर म्हणून हे भाग्य त्यांनी कमवून घेतलं. गंगाधरराव मोठे झाले तेसुद्धा त्यांच्या दैवानं नाही तर दराऱ्यानं. बुंदेल राजे त्यांना उगाच काका म्हणत नव्हते. ओरछा, दतिया, सिमथर, चरखारी, पन्ना, छत्रपूर अशांसारख्या संस्थानिकांच्या मानाचे मुजरे मिळावेत हा गंगाधररावांचा रुबाब. प्रत्येक झाशीकराचा मानबिंदू ठरलेले गंगाधरराव आसपासच्या राज्यात मान पावते झाले ते त्यांना दैवानं खेळवलं म्हणून ? छबेली या सर्वांपेक्षा मानाचं पान म्हणजे हिंदुस्थानात सगळीकडे यशाचे झेंडे फडकवणाऱ्या फिरंग्यांचे गंगाधरराव एक अत्यंत विश्वासू दोस्त.

राणी : ( एकदम ) बंद करा – बाबा बंद करा.

मोरोपंत : काय झालं छबेली ?

राणी : माझ्या विचारांची लाट याच किनाऱ्यावर येऊन थडकली आहे बाबा. हिंदुस्थानात सर्वत्र यशाचे झेंडे फडकवणाऱ्या फिरंग्याचे हे अत्यंत विश्वासू दोस्त ! हं ! दैवानं आमच्या घराण्याला – या हिंदुस्थानला- खड्डयात लोटण्याचा प्रयत्न चालवला असेल तो इथेच.

मोरोपंत : काय म्हणतेस छबेली ? असला कोणता विचित्र विचार तुझ्या डोक्यात थैमान घालतो आहे ! फिरंग्यांची सत्ता अबाधीत राह्यावी म्हणून तर नेवाळकर घराण्याने त्यांना सर्वतो-

परी सहाय्य करायचं ठरवलं ना ! आणि या गोष्टीचा केवळ हिंदुस्थानात नव्हे तर युरोपखंडातही गौरव करण्यात आला ना ! सांग मला. तुझ्या यजमानांनी एका शब्दाने कधी फिरंग्यास दुखावलं ते ! उलट वेळ येईल तशी–शक्य होईल तशी–इतकंच काय पण करता येईल तशी मदतच केली ना ! आणि फिरंग्यांनी-सुद्धा झाशीची मान हिंदुस्थानात–

राणी : ( एकदम वाक्य पुरं करीत ) कशी लवकरच केसाने कापता येईल अशीच व्यवस्था केली ना !

मोरोपंत : ( आश्चर्याने ) म्हणजे ! काय म्हणतेस छबेली !

राणी : सत्य.

मोरोपंत : हे सत्य.

राणी : होय हे सत्य. घरच्या देवापुढे ठेवलेल्या नैवेद्याच्या वाटीतील दूध एका जहरी नागाला आम्ही पाजतो आहोत याची आम्हाला कल्पना कुठे आहे ? फिरंगी आमचे दोस्त–फिरंग्यांचे आम्ही विश्वासू दोस्त–कां ? कशाकरता ते आमचे दोस्त झाले ? कोण ते ! इथे कशाला आले ! उद्योग करण्याकरता त्यांना स्वतःचं राष्ट्र नाही !

मोरोपंत : छबेली.

राणी : त्यांना बोलण्यात काय अर्थ आहे ? आमच्या पुरुषांनी हातात बांगड्या भरल्या म्हणून आम्हा बायकांचे हात बांगड्या-सकट त्यांच्या हातात गेले....बाबा ती पटईवरून पळणारी पाल समोरच्या कीटकाला एकदम गिळून टाकते त्याप्रमाणे हा फिरंगा हिंदुस्थानातल्या सुटयासुटया संस्थानिकांना सुटासुटा गिळून टाक-णार आहे. या दोस्ताचं खरं स्वरूप काय होतं हे सांगायला

एखादा तरी संस्थानिक उरेल का नाही याची शंकाच आहे. कारण बघता बघता एकेक संस्थान चाललं. जे आज दिसतंय ते उद्या नाही. जे उद्या असेल ते परवा असणार नाही.

मोरोपंत : काय म्हणतेस छबेली ?

राणी : पहा ना....त्रेचाळीस साली सिंध संपला. कैथाल गेलं, सत्तेचाळीस साली सातारा खालसा झालं, एकूणपन्नास साली पंजाब गेला. संबालपूर संपलं....हळुहळू ही संस्थानी खेळणी या आपल्या दोस्ताच्या खिशात छानपैकी सुस्त होऊन बसतील. बाबा मला आपलीच कीव कराविशी वाटते. नाही....माझा जन्म जरा उशिरा झाला नाही तर....

मोरोपंत : छबेली तुझ्या विचारांची दिशा चुकते आहे असं मला वाटतं.

राणी : असं ? काय होईल असा तुमचा तर्क आहे बाबा. सांगा ना. मला तरी समजू दे.

मोरोपंत : तुझ्याशी काय मी वाद घालणार ! पण माझ्या अल्पमतीला वाटतंय, किंबहुना माझी खात्री आहे की लॉर्ड डलहौसीसाहेब तुला मदत करतील. गंधाधरपंतांनी केलेलं सहाय्य ते विसरणार नाहीत किंबहुना विसरूच शकणार नाहीत. तुझ्या इच्छेप्रमाणे दत्तकविधान तर मंजूर होईलच इतकंच नव्हे तर यापेक्षासुद्धा काही जास्त गोष्टी घडून येतील असा माझा आत्मविश्वास आहे. पण तू मात्र उगाच काहीतरी....मला तुझी भीती वाटू लागली आहे छबेली.

राणी : घाबरू नका बाबा. भावनातिरेकानं, अविचाराचं कोणतचं कृत्य माझ्या हातून होणार नाही. दत्तकविधान मंजूर झालं

तर ते मला हवंच आहे. पण यदाकदाचित आपल्या दुर्दैवानं ते नामंजूर झालं तर मात्र दत्तक आणि झांशी यापेक्षा फिरंग्यांना मी महत्त्व देणार नाही बाबा. ( लक्ष्मणराव पांडे येतात. )

पांडे : ( मुजरा करून ) राणीसरकार !

राणी : कोण ? पांडे ! काय बातमी आहे.

पांडे : राणीसरकार, मेजर जनरल एलीस आपल्या भेटीला आले आहेत.

मोरोपंत : कोण ? डलहौसीसाहेबांचा माणूस !

पांडे : होय तेच.

राणी : येऊ दे. ( मेजर जनरल एलीस येतो. )

एलीस : यूवर हायनेस लॉर्ड डलहौसी शायबानी खास टुमच्या करिटा ऑरडर केलेला हा जाइरनामा मेजर डी. ए मालकम शायबाणी काढला. त्येचा मऱ्हाठी टर्जूमा आमी टुमाला आता सपूर्ट करतो. यूवर हायनेसनी टेचा स्वीकार करावा.

( जाहीरनामा राणीस देतो )

राणी : लक्ष्मणराव पांडे, वाचा हा जाहीरनामा.

पांडे : आज्ञा राणी सरकार.... (वाचतो) मेजर डी. ए माल-कम, पोलिटिकल एजंट ग्वाहेर, बुंदेलखंड आणि रेवा याजकडून पुढीलप्रमाणे जाहीरनामा काढण्यात येत आहे. झाशीचे महाराज गंगाधरराव हे तारीख २१ नोव्हेंबर १८५३ रोजी कैलासवासी झाले. त्यांनी मरणापूर्वी दामोदरराव यांस दत्तक घेतले आहे. परंतु नामदार गव्हर्नर डलहौसी साहेबांनी हे दत्तकविधान.... ( थांबतो. )

राणी : वाचा पांडे. थांबू नका. काय असेल ते वाचा.

पांडे : ( वाचीत ) ते दत्तक विधान नामंजूर केल्यामुळे–

मोरोपंत : काय दत्तकविधान नामंजूर ! शक्य नाही.

राणी : शांत व्हा बाबा. वाचा पांडे....

पांडे : ( वाचीत) दत्तक विधान नामंजूर केल्यामुळे हिंदुस्थान सरकारचे सेक्रेटरी यांनी तारीख ७ मार्च १८५४ रोजी हुकूम काढला. त्यानुसार झांशी संस्थान ब्रिटिश सरकारचे राज्यात सामील करण्यात आलेले आहे. या जाहीरनाम्याद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की झांशी प्रांत तूर्त बुंदेलखंडाचे एजंट मेजर एलीस यांच्या ताब्यात दिला आहे. तेव्हा झाशी संस्थानातील सर्व प्रजेनं आपण ब्रिटिश सरकारच्या ताब्यात आहोत असे समजून यापुढे मेजर एलीस यांना वसूल देत जावा आणि सुखी व संतुष्ट असावे,

सही. डी. ए. मालकम,

( बंद करून राणीला देतो)

राणी : नाही, मला हे मंजूर नाही.

एलीस : यूवर हायनेस. टुमी अशी हेस्ट करू नको. टुमची योग्य ती केअर घेणेची शाहेब मालकम यांनी मला ऑरडर दिली आहे. टेपरमाणे आमी टुमाला हेरक मंथला पाच हजार रुपये तनखा देणेचा कबुल करटो. एवढंच नाई टर टुमचा शर्व रिलिटिव्हच्या खरचाला पैका देणेचा पण कबूल करटो. टरी तुमाला वरी करणेचे कारण नाय. टुमी आमाला हेल्प करा.

राणी : (संतापानं) पाहिलंत बाबा ! आमच्या पूर्वजांनी पाजलेलं पायस पिऊन पोसलेले हे नाग आता आमच्यावरच विषारी गरळ ओतू पहात आहेत. दोस्तीवर नितांत भिस्त ठेऊन

अस्तनीतला जपून ठेवलेला हा अग्नी आता वडवानल होऊन आम्हालाच चावू इच्छितोय. हे नाग आमचे दोस्त ! हा वडवानल आमचा मित्र ! पण अजून आमचे डोळे उघडायचे नाहीत. सर्वांगावर विषाचा संचार होऊन ते निळं पडलं तरी आम्ही या नागाला गोंजारणार ते गोंजारणारच. अरेरे....विषाचा परिणाम केवळ रक्तावर होतो म्हणून....तो डोळ्यावर होऊन आमचे डोळेच नाहीसे झाले असते तर निदान आंधळेपणानं आम्ही मिळेल त्याला मित्र मानला ही तरी सबब सांगायला मिळाली असती. कानावर विषाचा परिणाम होऊन आम्ही बहिरे झालो असतो तर या फिरंग्यांच्या या फसव्या दोस्तीवर आम्ही फिदा झालो अशी फिर्याद तरी आम्हाला फर्मावता आली असती. पण नाही. आम्ही डोळे असून आंधळे आहोत. कान असून बहिरे आहोत....असलेल्या तोंडाचा उपयोग मात्र फितुरी आणि फसवेगिरी यातील करामती साधण्याकडे करीत असतो....दत्तकविधान नामंजूर झालं.... बाबा ऐकलंत ना !

मोरोपंत : ऐकलं छबेली

राणी : आता तरी माझं म्हणणं पटलं ना ?

मोरोपंत : नाकारण्यात काय अर्थ आहे ?

राणी : बाबा....आता झाशी बरबाद होणार....हे राज्य नष्ट होणार...हा राजवाडा जाणार....

एलीस : नो यूवर हायनेस. हा पॅलेस जानार नाय. हा टुमचा पॅलेस टुमच्याकरिटा ठेवून द्या अशं मालकम शाहबानी टूमाला शांगायला शांगितला हाअे. टशच टुमच्या ट्रेझरीटला शर्व पैका टुमालाच वापरटा येईल अशी व्योवस्था आमी पाज्जे टेवा करून देअू.

मोरोपंत : मेजर एलीस–

एलीस : येस सर.

मोरोपंत : दत्तकविधान नामंजूर झालं या बाबतीत राणी सरकारवर अन्याय होतो असं तुम्हाला वाटत नाही ? राणीसरकारचे पूर्वज रामचंद्रराव यांच्याशी दोस्तीचा तह करण्यात आला तेव्हा झाशीचे राज्य वंशपरंपरागत राखावे असे आश्वासन कंपनी सरकारने दिले होते हे आपल्याला माहीत असेलच.

एलीस : मला माईट हाअे.

मोरोपंत : मग ते आश्वासन कंपनीनं पाळलं का नाही ?

एलीस : कंपनीनं आशवाशन पाळलं हाअे.,

मोरोपंत : दत्तकविधान नामंजूर करून...

एलीस : राणीसरकारची औरस शंटटी अशटी टर कंपनीनं दट्टक मान्य केला असटा. पण दुर्दैवानं तेना औरस शंटटी नाई म्हणून वंशपरंपरा चालणेरा गाडीला-या झाशीच्या गद्दीला-कोणी वारस नाई असे लॉर्ड डलहौसी शायबांनी ठरवला आहे. आणि म्हणून दट्टक नामंजूर झाला आणि टेचकरटा राज्य खालसा करून टाकला.

मोरोपंत : औरस संतती नसली तरी दत्तक मुलाचे अधिकार हिंदू धर्माप्रमाणे औरस मुलाइतकेच असतात.

एलीस : अशं टुमी मानटा....डलहौसीसाहब मानट नाईत.

मोरोपंत : तेही मानतात– मानत असावेत. दत्तकविधानाची तत्वं त्यांनाही मंजूर असावीत.

एलीस : कशावरून ?

मोरोपंत : नाहीतर तेहेरी आणि दतिया या संस्थानिकांचे दत्तक झांशीप्रमाणेच नामंजूर झाले असते.

एलीस : टेंची गोष्ट वेगळी आहे

मोरोपंत : कशाबद्दल ? ते निराळे कां ?

एलीस : ती संस्थाने इंडिपेंडंट अशटो. झाशी मांडलीक आहे आणि मांडलिकांचा हक्क लिमिटेड करणेचा राइटस् बडे गवर-मेंटला अशटो. दट्टक मान्य नाय म्हणून वारस नाय आणि वारस नाय म्हणून राज नशटो.

मोरोपंत : हं झाशी मांडलीक !....एलीस १८४२ साली ब्रह्मी युद्धाच्या वेळी याच मांडलीक झाशीनं त्या ब्रह्मदेशाला धान्य पुरवलं होतं. लॉर्ड आइन्सलोसारखा साहेबानंसुद्धा या गोष्टीची तारीफ केली होती. ही गोष्ट तुम्हाला आठवायची नाही.

एलीस : आमाला आठवतो.

मोरोपंत : मग त्याचा काय उपयोग झाला ?

एलीस : टी हकीगत वायली आहे.

मोरोपंत : भरतपुरचा वेढा पडला तेव्हा याच मांडलीक झांशीनं तुम्हाला मदत केली होती. नाना पंडितानं काल्पीत बंड केलं होतं तेव्हा याच मांडलीक झांशीनं आपल्या तोफा, पायदळ स्वार, जितकं जितकं म्हणून शक्य होतं. तितकं सगळं सहाय्य कंपनीला केलंय. त्याचा हा नतिजा ! दत्तकविधान नामंजूर !

एलीस : आमीसुद्धा टे गोष्टीचा गौरव करतो. लार्ड बेटींग शाहबानं हेच करीत रामचंद्ररावांना महाराजाधिराज फिदवी जनुहा इंग्लिस्तान अशी पदवी पेश केला होटा.

मोरोपंत : मग तरीसुद्धा या तुमच्या कानामधल्या गोष्टी तुमच्या डोक्यात का शिरत नाही. कां सत्तेनं माज चढला आहे तुम्हाला ?

एलीस :( रागावून ) यूवर हायनेस, आमी फक्त आमची डूटी जाणते. आजपासून झाशी माज्या ऑरडरखाली च्यालेल. तुमच्या काही कंप्लेन्ट असतो टर ते टुमी लॉर्ड डलहौसी शाहबाला पेश करा. या ऑरडरीत बदल टेच करू शकटाट,

राणी : ( संतापानं ) अस्सं....मग डलहौसीची ऑरडर येण्यापूर्वीच त्याला माझा निरोप सांग की माझ्या झाशीचा आणि तुझा काहीएक संबंध नाही.

एलीस : यूवर हायनेस.

राणी : मी ओळखत नाही त्याला.

मोरोपंत : छबेली ?

पांडे : राणीसरकार !

एलीस : यूवर हायनेस !

राणी : आणि म्हणून त्याची ऑरडर मी पाळू शकत नाही.

पांडे : राणीसरकार....

राणी : पांडे, तुम्ही एलीसला जायला सांगा...

एलीस : बट यूवरहायनेस–

राणी : अजून तू इथं का उभा आहेस ! माझं म्हणणं तुला ऐकू आलं नाही. जा जाऊन साहेबाला नाहीतर सरळ विलायतेला निरोप दे की – झाशीच्या राणीनं–राणी लक्ष्मीबाईनं सांगितलंय की झाशी माझी आहे.

पांडे : पण राणीसरकार

राणी : काय पांडे–पण कसला !

पांडे : मी बोलू कां ?

राणी : जरूर

पांडे : राणीसरकार, आपल्याला एक नम्र विनंती करावीशी वाटते–राज्याचा प्रधान या नात्यानं मी या प्रसंगी दोन शब्द बोलणं मला आवश्यक वाटतं.

राणी : बोला.

पांडे : राणीसरकार.... खारीच्या दातांना धार असली तरी तिनं दगड फोडण्याचा प्रयत्न करू नये.

राणी : मतलब ? पांडे काय सांगायचं असेल ते सरळ सांगा. उगाच त्या उपमा नकोत.

पांडे : राणीसरकार, इंग्रजांसारख्या श्रेष्ठ आणि बलिष्ठ सरकारापुढे पेशव्यांचीही गादी नष्ट झाली. मोठेमोठे धुरंधर कामी आले. शरण गेले. अशा विराट शक्तीपुढे आपण एकाकी टक्कर देणं इष्ट नाही तेव्हा आपण थोडी पड खाऊन त्यांच्या अटी मान्य केल्या तर सगळ्यांचंच भलं होईल.

राणी : ( बेभान होऊन ) लक्ष्मणराव पांडे, हातात बांगड्या भरा तुम्ही. प्रधान या नात्यानं मला असला भ्याड सल्ला देताना तुम्हाला लाज वाटली पाहिजे. नामर्द आहात तुम्ही. जातीची स्त्री असून पुरुषी रक्त माझ्या शरीरात सळसळत आहे. अपयशाची लाज आणि भीती मला नाही. लाज वाटेल ती अपकीर्तीची. मरणाला मी घाबरत नाही मग शरणाची भाषा कशाला ? झाशीची राणी लढता लढता मेली अशी माझ्या मरणाची केलेली टीका मला आवडेल. पण लढाई सोडून राणी पळाली, शरण येथून सुखासीन झाली ही अपकीर्ती मला नकोय.

पांडे : माझे ऐकावं राणीसाहेब.

राणी : शक्य नाही.

पांडे : आपण गैरसमज करून घेता आहात.

राणी : गैरसमज ! पांडे माझ्याबद्दल तुमचा गैरसमज झाला आहे. मी नानासाहेब पेशव्यांची बहीण आहे. शिवरामभाऊ नेवाळकरांची सून आहे. लहानपणापासून लढण्याचे धडे गिरवले आहेत मी. रणातून पळून जायला शिकले नाही.

पांडे : राणीसरकार !

राणी : एक शब्द बोलू नका. नामर्द, मला तुमची लाज वाटते. तुमच्यासारख्या नामर्दांनीच या इंग्रजांचा पाय भारतात पक्का केला.

मोरोपंत : छबेली !

राणी : काय बाबा ?

मोरोपंत : काय झालं हे?

राणी : तुम्ही उपकाराची भाषा बोलून थकलात. जिथे विस्तवच नाही तिथे राख कशाला फुंकलीत! आता तरी जागे व्हा.

मोरोपंत : काय करायचं ठरवलं आहेस पोरी !

राणी : क्रांतीचा मुहूर्त आताच ठरू द्या.

पांडे : राणीसरकार !

मोरोपंत : छबेली !

राणी : ती पहा माझी प्रिय झाशी मला हाका मारीत आहे. चला माझ्याबरोबर .... तुम्हाला अशक्य वाटतंय ते मी शक्य करून दाखवते. झांशीतल्या प्रत्येक स्त्रीला मी मानानं कसं मरायचं हे शिकवीन ... झाशीतल्या प्रत्येक व्यक्तीला जवळ बोलावून सांगेन. ' चला आता आपल्याला खरेखुरे जीवन जगायचे आहे....' एक दिवस मानाने जगा. कीर्ती मिळवून एक तास जगा ... एक

क्षण जगा. आतापर्यंत मातीमोलानं कंठलेल्या आयुष्याचं सोनं होईल. पहा माझे बाहू आता स्फुरण पावू लागले आहेत. हात कसे शिवशिवत आहेत. नजर कशी तीक्ष्ण झाली आहे. चंडीमाता माझ्या अंगात संचारली आहे. आता ती वाटेत सापडेल त्या शत्रूला सरळ कापीत जाणार. हे जगन्माते माझ्या या हातांना पाताळात दडलेल्या शत्रूच्या नरडीच्या रक्ताचा स्पर्श होऊ दे.... विश्वासघातकी, क्रूर, कठोर, कृतघ्न शत्रू जिथे जिथं सापडेल तिथे त्याच्या रक्ताने मला नाहू दे.

एलीस : यूवर हायनेस–याचा कॉन्सिक्वेन्स फार वर्स्ट होईल. टुमी नामशेष होईल. आमच्याजवळ आर्मी, पैका आणि शिष्ट भरपूर आहे टुमचे हे लहान संस्थान उडवायाला आमाला थोडा सुदा टाईम लागणार नाई. म्हणून शंगतो आपण शबुरीनं घ्या.

राणी : एलीस–राज्याचा इतिहास बदलण्याकरता फक्त सैन्य आणि संपत्ती यांचीच गरज असते असं नाही. श्रदा आणि जिद्द यांचाही उपयोग होतो. आमच्या दुर्दैवानं आमचा पराभव झाला तरीसुद्धा या रक्तानं लाल झालेल्या मातीवरच तुम्हाला तुमचे इमले चढवावे लागतील. आणि माझी खात्री आहे की एकना एक दिवस याच स्वाभिमानी मातीतून नवीन इतिहास निर्माण होईल. याच वसुंधरेतून क्रांतीची फुलं निर्माण होतील. हीच धरित्री युग-पुरुषांना जन्म देईल आणि आमच्या हातून अपुरं राहिलेलं काम पुरं करून घेईल. एलीस तुम्ही आमचा जीव घ्याल पण श्रद्धा घेऊ शकणार नाही. ती नेहमीच अपराजिता राहील.

एलीस : यूवर हायनेस– आमी टुमच्या भावना चांगले जाणतो. आमी शुद्धा इंग्लिशब्लडचा अभिमान बाळगटो. टुमच्या सारखा

विचार इंडियातल्या दुसऱ्या राजांनी केला असटा तर आमाला इकडे यायला चान्स मिळाला नसटा. टुमचा हा राष्ट्रप्रेम पाहून आमी टुमाला अभिवादन करटो. ( वाकून मुजरा करतो )

मोरो. : हे नुसते पोकळ अभिवादन कशाला ! लॉर्ड डलहौसी-पुढे जाऊन राणीच्या वतीनं कैफियत मांडा.

एलीस : वेरी सॉरी–मोरोपंट. ड्यूटी इज ड्यूटी.

राणी : एलीस....मग करच तू आपलं कर्तव्य.... ( तलवार उपसून ) घाबरू नको. जा जाऊन सांग तुझ्या सायबाला की झांशीच्या राणीनं म्यानातून तलवार बाहेर काढली आहे आणि तिचा निर्वाणीचा जबाब आहे की झाशी माझी आहे. मैं खूद मरूंगी। लेकीन मैं मेरी झाँशी नहीं दूंगी। ( एलिस जातो. )

क्रांतीला सुरुवात झाली. बाबा मला आशीर्वाद द्या.

मोरोपंत : मी !

राणी : हो. का बाबा दचकलात.

मोरोपंत : तसं नाही छबेली.

राणी : मग ?

मोरोपंत : केवळ नात्याने मोठेपण मिळालं म्हणून मला आशीर्वाद देण्याची संधी मिळतेय. नाहीतर तुझेच आशीर्वाद घ्यावेत इतक्या मोठ्या मानाची आणि थोर मनाची झाली आहेस तू....तुझा विजय झालाच आहे. चंडीमाता तुझ्यामागे अव्याहत उभी राहील. तुझे मनोरथ तीच पुरे करील....

( आशीर्वाद देतानाच पडदा )

卐 卐 卐

# शिवाजी महाराजांच्या भेटीस एक इंग्रज

## (एक ऐतिहासिक प्रवेश)

पात्रे – १. शिवाजी महाराज

२. एक इंग्रज

आणि

निवेदक

( स्थळ–महाराणीचा महाल–निवेदक–निवेदन करतो. )

शिवाजी महाराजांच्या आयुष्यातला हा एक महत्त्वाचा प्रसंग. स्वराज्याचं तोरण बांधायला महाराज निघाले तेव्हा अनेक सोन्या-सारखी माणसे मिळाली–पण हे–माणसाचं सोनं व्यवहारात किम-तीचे नसते. तिथे गरज असते खऱ्या सोन्याची–पैशांची. स्वरा-ज्याचा हा गाडा सुरळीत चालवायला महाराजांना आता पैसा उभा करणं जरुरीचं झालं. अशा वेळी त्यांनी सुरतेसारख्या श्रीमंत शहराची लूट करायचं ठेरवलं. या लुटीमागे स्वराज्यासाठी खंडणी हा त्यांचा हेतू होता. या लुटीच्या वेळी मात्र त्यांना निरनिराळ्या गोष्टी शिकायला मिळाल्या. बऱ्याच निराळ्या. त्या शिकवणारा होता इंग्रज टोपीवाला. १६६४ च्या जानेवारीत महाराजांनी सुरतेवर पहिला हल्ला केला तेव्हा तर जॉर्ज ऑक्सेडन नावाचा इंग्रज अधिकारी होता. हा मोठा शूर आणि धाडसी होता. प्रत्यक्ष

औरंगजेबानंसुद्धा याच्या धैर्याचं कौतुक केलं. चिमूटभर माणसांच्या मदतीनं त्यानं इंग्रजांची वखार वाचवली होती. इतकंच नाही तर महाराजांच्या धमक्यांना धूप तर घातली नाहीच उलट महाराजांनाच निरोप पाठवला की तुमचा निरोप घेऊन कोणी जासूद आला तर आम्ही त्याला ठार मारू. असे हे शिस्तप्रिय स्वाभिमानी इंग्रज. पुन्हा १६६६ मधे महाराजांनी आपला मोर्चा सुरतेकडे वळवला याही वेळेला फक्त तीस माणसानिशी स्टिनशॅम मास्टर महाराजांशी लढाई करू लागला. तोही मोठा शूर. त्यानं महाराजांची बरीच माणसं ठार मारली. तीन दिवस तो लढत होता. महाराजानांही त्याला जिंकणं सोपं गेलं नाही, त्यांनी निरनिराळे निरोप पाठवून पाहिले. शेवटी महाराजांची ताकद ओळखून त्या स्टिनशॅम मास्टरनं आपला माणूस महाराजाकडे पाठवला. महाराजही त्याची वाट पहात होते. हजारो मैलावरच्या माणसाची माती त्यांना पाहायची होती. मास्टरचा माणूस महाराजांना नजराणा घेऊन आला होता. नजराण्यात होती उंची वस्त्रं तशीच शस्त्रंही. निवेदक जातो. व (शिवाजी महाराज येऊन बसतात. नंतर मास्टरचा माणूस येतो मुजरा करतो. )

इंग्रज : शिवाजी माराजांचा विजय असो. आमी मास्टर शाहेबाकडून मुडडाम टुमचेकडे जिवडान घेनेसाठी आलो आहोट. आमी आमच्या बरोबर येटाना आपलेसाठी नजराणा आणला आहे तेचा स्वीकार करून आमाला आनंद मिळावा ही विनंटी. ( शिवाजीमहाराज नजराणा स्वीकारतात ) आभारी आहोट.

शिवाजी : तुमच्या मास्टरसाहेबांना ही अक्कल लवकरच सुचली तर ! आम्ही तुमची बरीच गय केली हे तुम्हाला माहीत

म. ग्र. सं. ठाणे, वाचनालय शा.
वा. क्र (२१) ... नों. दि ...
वि. ... क्र. ........

असेल. परवापासूनच आम्ही पाहातो आहोत तुम्ही आमच्या संदेशाची पायमल्ली करता आहात....याचा परिणाम काय होईल याची तुम्हाला जाणीव आहे ना !

इंग्रज : माराज, आपण मोठे आहाट. आम्ही लहान आहोट.

शिवाजी : तुम्ही लहान आहात म्हणून आमची माणसं मारलीत तुम्ही ! तुमच्यापेक्षा ते फरांसिस मोठे आहेत. तुमच्यापेक्षा त्यांच्याजवळ माणूस जास्त आहे. शस्त्रं जास्त आहेत. त्यांनी आमचा शब्द गेल्याबरोबर मान दिला आणि तुम्ही ? त्यांनी आम्हाला दारूगोळा दिला आणि तुम्ही आमच्या माणसावर गोळ्या झाडल्यात.

इंग्रज : टसं नाही माराज--आम्ही फक्ट आमच्या वखारीचे रक्षण केले. आमी व्यापारी मानसं. आमाला फाईटमध्ये रस नाही. आमच्या हाटून टुमची माणसं मेळी तेबद्दल आमी अफसोस आहोट. आम्ही दिलगिरी देटो.

शिवाजी : हे पहा ही तुमची दिलगिरी आम्ही चांगली जाणून आहोत. आता दिलगिरी काय ? तुमचं नशीब म्हणून मास्टर आमच्या हातून सुटला नाहीतर तुम्हाला खतम करायला आम्हाला किती वेळ ? आता दिलगिरी ! आज जरवेचा निरोप पाठवला तेव्हा दिलगिरी. पण तुमच्या मास्टरनं या आधी आम्हाला काय निरोप पाठवला माहीत आहे ना तुम्हाला.

इंग्रज : माहीट आहे. परंटू त्येचाबड्डल माराजांनी नाखूष राहू नये अशी मास्टर साहेबांची विनंटी आहे.

शिवाजी : वा ! आम्हाला उलट जबाब विचारणाऱ्या माणसाबद्दल आम्ही नाखुषी दाखवू नये तर काय उलट जहागिरी देऊन त्याची सर्फराजी करावी ! काय बमुर्वतखोर सवाल होता तुमच्या

मास्टरसाहेबांचा ! ∴ मुंबईकर इंग्रजांशी मराठ्यांची मैत्री आहे मग सुरतेतच वैर कां ? हा सवाल मनापासून असता तर आम्ही सुरतेत पाऊल ठेवताक्षणीच विचारायला हवा होता. तोसुद्धा आमच्या इथे येऊन. आमचा माणूस पाठवल्यावर त्याच्याबरोबर ही बेशरमी भाषा करण्याची पद्धत नाही. आम्ही नरमाईनं घेतो म्हणून. जेरबंद करून इथे तुमच्या मास्टरला आणलं असतं तर काय हिंमत होती आम्हाला तो बेमस्तवाल सवाल करण्याची ! त्याची जीभच खेचून टाकली असती. हं–आता दिलगिरी पाठवतोय.

इंग्रज : गुस्टाकी माफ असावी माराज. पन आपला काही तरी गैरसमज होटोय. मास्टरसाहेबांचे बोलणेचा हेटू अशा होटा की मराठा आमच्या फ्रेंड आहे आमचा मुंबईच्या भावाशी टेची खूप डोस्टी आहे. यासाठी ज्यानं आमच्या भावाशी हाट मिळवला तेच नजरेनं–तेच फ्रेंडशिपनं टुमी आमचेकडे पाहावे.

शिवाजी : ही वकिली करू नका. आता तुमची ही नरमाईची भाषा झाली. सुरुवातीला दम होता तुमचा. आता तुमच्या लक्षात आलंय की आज आपण शरण आलो. नाही तर त्याचं उत्तर एकच मरण–म्हणून तर हा नजराणा आणि तुम्ही–खरं की नाही.

इंग्रज : मी तुमच्यापुढे काय बोलणार ?

शिवाजी : का ? बोलण्यासारखं काही उरलंच नाही तर बोलणारच काय तुम्ही ?

इंग्रज : टुमी राजामानूस सम्दं जाननारे, राजकारण खेळनारे. आम्ही बेपारी माणूस. आमची नजर धंदेवर.

शिवाजी : तुम्ही व्यापारी ! तुमचा हा अव्यापारेषु व्यापार न समजण्याइतका दूधखुळा नाही. तुम्ही-व्यापारी आहात ना ?

इंग्रज : होय आम्ही व्यापारी आहोट.

शिवाजी : नक्की ?

इंग्रज : हो नक्की ?

शिवाजी : मग तुम्हाला बंदुकाची जरुरी कां ? तुमच्या वखारींना एवढी तटबंदी कशासाठी.

इंग्रज : आमी परदेशी व्यापारी. आमीच आमचें रक्षन केले नाय टर आमाला कोन वाचवनार ! आमची बायकामुळेपन संगती आहेट. तेना कोन वाचवनार ! माराज आपन विचार करा. आटा टुमी आहात आमी टुमचेकडे आलो. उद्या मोगल आला तर तेवापन आमी जाऊ–आमाला सगळे सारखे–

शिवाजी : खोटया बयाती सांगू नका. आम्ही तुम्हाला चांगले जाणून आहोत. मागच्या लुटीच्या वेळी तुमच्या साहेबानं आम्हाला काय सांगितलं होते ते कदाचित तुम्ही विसरला असाल. पण आम्ही विसरलो नाही. विसरणं शक्य नाही. आम्ही आमचा जासूद पाठवला तर ते त्याला ठार मारणार होते.... सांगा. तीच शिक्षा आता आम्ही तुम्हाला दिली तर ! बोला आता आम्ही तुमचा शिरच्छेद केला तर ! .... (तलवार उपसतो)

इंग्रज : आपन करू शकटा (मान खाली करतो)

शिवाजी : म्हणजे ? ( शिवाजी महाराज चकीत होतात)

इंग्रज : मी हुकुमाचा टाबेदार आहे. आमच्या शिष्टिनं बांधलेला आहे. आपन मला ठार मारलट तर टी शिक्षा मी भोगाला तयार आहे. कारन मी इथे टी चुकवली तरी आमचे साहेबाजवळ चुकवटा येणार नाही. परंतु मी टुमचेपुढे दयेची विनंटी करटो. आपन ठीक तो निकाल देनार याची मला खाटरी

वाटते. कारण तुमचा कारोभार मी उघडे नजरेनं पाहाटो. टुमी आमच्या चर्चेला हाट लावट नाही. आनी तेंबद्दल कोनालापन तरास देट नाही. गेले टाईमला फादर अॅम्ब्रासला हाट पन टुमी लावला नाही हे मला ठाऊक आहे. याचाच अर्ठ टुमी उगीचच कोनावर अन्याव करनार नाही याची मला खाटरी वाटते. आम्ही इंग्रज मानसं. आमच्या हाटी शस्त्रे बाळगतो येचा टुमाला राग येटो. पन माराज आम्हाला आमच्या देशाचा हुकूम प्यारा आहे. आमच्या जानपेक्षा प्यारा आहे. तेसाठी आमी वाटेल ती कुरबानी करायला तयार असतो. आमचा आमचे वागणेचा जाब इंग्लंडला देवा लागटो म्हणून मी टुमाला परसनली म्हणजे सवटाची विनंटी करटी की टुमी काहीपन मनात न ठेवता आमास जीवदान द्या. आमच्या आकाशला बाप टुमाला यश देईल. आपण आमच्या देशात पैदा झालें अशटे तर आम्ही तुम्हाला डोक्यावर घेऊन नाचले असते.

शिवाजी : ठीक आहे. आम्ही तुम्हाला जीवदान देतो.

इंग्रज : आभारी आहोट.

शिवाजी : पण लक्षात ठेवा.... पुन्हा आमच्या विरुद्ध लढण्याचा बेत केलात तर मात्र तुमची गय केली जाणार नाही

इंग्रज : आमाला मंजूर आहे.

शिवाजी : ठीक आहे. तुम्ही जाऊ शकता.

( इंग्रज निघून जातो)

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
.. क्र. 98C40४ नों. दि. 8/3/...
वे. ...
IRBK-0116874
IRBK-0116874